ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १२ वे । अंक २ रा
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर - २०२१



# लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक

Scanned with CamScanner

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १ २ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २ ० २ १

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४ ३ १ १ ० ३.
मो. ९९०४००३९९८

Scanned with CamScanner

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

## लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक (भाग-४)

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●
डॉ. युवराज धबडगे प्रा. नागेश बोन्तेवाड
मराठी विभागप्रमुख मराठी विभाग
दगडोजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज, जि. औरंगाबाद

● संपादक मंडळ ●

डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. ममता इंगोले
डॉ. फुला बागूल
डॉ. वंदना महाजन
डॉ. वामन जाधव
डॉ. अनिल गर्जे
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. यशवंत सोनुने
डॉ. संजय सांभाळकर

मूल्य : ३५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड,
जि. औरंगाबाद – ४३११०३. मो. ९९०४००३९९८



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 59. | **महागीतकार वामनदादा कर्डक यांच्या गीतातील समग्रता**<br>- अविनाश साळवी / प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ | 253 – 255 |
| 60. | **लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य**<br>- मनिषा एकनाथ थुट्टे | 256 - 258 |
| 61. | **वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता**<br>- प्रा. संदीप परदेशी | 259 - 261 |
| 62. | **वामनदादा कर्डक यांच्या लेखनातील वैविध्यता**<br>- डॉ. कैलास इंगळे | 262 - 264 |
| 63. | **लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील गीतभीमायन**<br>- डॉ. युवराज धबडगे | 265 - 269 |
| 64. | **महाकवी वामनदादाचे शैक्षणिक तत्वज्ञान**<br>- प्रा. विजय देविदास वाकोडे | 270 - 274 |
| 65. | **लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान**<br>- अमोल जयदेव वानखेडे | 275 - 277 |
| 66. | **आंबेडकरी चळवळीचे क्रान्तिवाहक - वामनदादा कर्डक**<br>- डॉ. संतोष बनसोड | 278 - 283 |
| 67. | **आंबेडकरी शाहीर : वामनदादा कर्डक**<br>- प्रा.सौ. नंदा निवृत्ती मास्कर | 284 - 287 |
| 68. | **वामनदादा कर्डक यांच्या गीतातील आशयसौंदर्य व विषयविविधता**<br>- प्रा. लक्ष्मी नरहरी पवार | 288 - 290 |
| 69. | **लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरवादी तत्वज्ञान**<br>- शितल अण्णासाहेब सुसरे | 291 - 294 |
| 70. | **लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता**<br>- सतीश जमधाडे | 295 - 297 |
| 71. | **लोककवी वामनदादा कर्डक यांची गझल रचना**<br>- प्रा.डॉ. रविकांत शिंदे | 298 - 302 |
| 72. | **शाहीर वामनदादा कर्डक यांच्या गझलेचा आकृतिबंध**<br>- ज्योती स्वामी | 303 - 308 |




Scanned with CamScanner



# वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता

- प्रा. संदीप परदेशी
सहाय्यक प्राध्यापक,
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,
बलभीम महाविद्यालय, बीड.

---

वामनदादा कर्डक हे मराठी शाहीर कवी आणि आंबेडकरी चळवळीतील प्रमुख कार्यकर्ते होतेलोकशाहीर वामनदादा कर्डक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्या ओजस्वी वाणीतून आणि समर्थ लेखणीतून महाराष्ट्राच्या घराघरात, खेड्यापाड्यात, वाड्यावस्त्यांवर पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण काम केले भगवान गौतम बुद्ध, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांचा विचार हा वामन दादांचा श्वास होता ते त्यांचे ऊर्जेचे केंद्र होते. हे विचार प्रभावीपणे प्रसारित करत वामनदादा जीवनाच्या शेवटपर्यंत फिरत राहिले आणि यामुळेच समाज जागृत होत राहिला. वामनदादा हे आंबेडकरी चळवळीत उतरले होते. समतेच्या लढ्यात ते अग्रभागी होते.

वामनदादा बाबासाहेबांच्या अनेक सभांना जात समत सैनिक दलात तरुणांसोबत ते काठीला काठी लावून बाबासाहेबांना सभेच्या स्थानी जायला रस्ता करून देत. अशा विविध प्रकारे त्यांनी आंबेडकरी चळवळीमध्ये आपली महत्त्वाची भूमिका पार पाडली. इतकेच नव्हे तर त्यांनी बाबासाहेबांचे संपूर्ण विचार आपल्या काव्य गीतांच्या माध्यमातून मांडण्याचं व सुलभ सोप्या पद्धतीने ते जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले वामनदादाच्या काळातील सर्व वातावरण आंबेडकरमय झाले होते. या वातावरणात वामनदादा समरस झाले होते. याविषयी उत्तम कांबळे म्हणतात-

"वामनदादांच्या बोलण्यात भीम, वागण्यात भीम, गाण्यात भीम, जगण्यात भीम, आयुष्याच्या प्रत्येक श्वासात भीम, लढण्यात भीम, प्रत्येक प्रश्नांच्या इलाजात भीम असे एक भारावलेपण घेऊन वामनदादा जगले. आपला जन्मच भीम विचारांच्या प्रसारासाठी आणि समाजाला जागे करण्यासाठी आहे. या न्यायाने ते जगले. शब्द भिमाचे, आवाज भिमाचा, जगण्याची प्रेरणा भिमाची, स्वाभिमानी जगाची निर्मिती ही भिमाची अशाप्रकारे वामनदादांच्या जीवनाचा कणकण अवघा भीममय होऊन गेला होता"[१].

वामनदादा कर्डक यांच्या गीतांनी सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत आपली मोलाची भूमिका बजावली आंबेडकरी विचार हे त्यांच्या गीतांचे महत्त्वाचे साधन बनले. डॉ. बाबासाहेबांच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक तत्त्वज्ञानाची धार शाबूत ठेवणारी धारदार तलवार, आंबेडकरी विचारांचे कधीही न संपणारे बारूद आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत आंबेडकरी विचार जनसामान्यांमध्ये रुजवण्यासाठी अखंड आणि अविश्रांत पायपीट करणारा तसेच आपल्या अनेक सहकाऱ्यांना आपल्या सावलीत वाढवणारा आंबेडकरी विचारांचा बोधिवृक्ष असे कितीतरी विशेषणे वामन दादांना लावता येतील.



Scanned with CamScanner

प्रस्तुत ठिकाणी वामनदादांनी आपल्या काव्यगीतांमधून मांडलेला डॉबाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक विचार थोडक्यात मांडलेला आहे.

**वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांच्या आधारे वामनदादा यांनी येथील वर्णवादी जातीयवादी, विषमतावादी व्यवस्थेवर आपल्या गीतांमधून आसूड ओढले आहेत. या देशात सामाजिक सुधारणा घडवून आणायच्या असतील तर अगोदर चातुर्वर्ण्य व्यवस्था, वर्णवादी, हिंदू धर्मात सुधारणा कराव्या लागतील. कारण भारतीय समाजव्यवस्थेतील जातिभेद, धर्मभेद हे निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहेत. त्यामुळे मनुष्यनिर्मित भेदाभेद संपविणे अशक्य गोष्ट नाही. हे सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "जातीभेद हा निसर्ग जन्य भेद नव्हे हे प्रथम लक्षात ठेवले पाहिजे. आमक्या एका जातीतले सगळेच लोक बुद्धिमान तेजस्वी, सदाचरणी असे निपजतात आणि दुसऱ्या एका जातीतले सगळे लोक निर्बुद्ध,अजागळ व दुराचरणी निपजतात असे जोपर्यंत दाखवून देता येत नाही तोपर्यंत जातिभेद हा नैसर्गिक भेद आहे असे म्हणता यावयाचे नाही. मनुष्य कृत भेद नाहीसे करणे मनुष्याला शक्य नाही व सध्याची सामाजिक विषमता मनुष्य कृत असल्यामुळे काढून टाकणे शक्य आहे"[२]

यावरून डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक सुधारणांची दिशा आपल्याला लक्षात येते भारतातील जन्मावर आधारित जातीयता व धार्मिकता नष्ट झाली पाहिजे ही भावना व्यक्त करताना वामनदादा म्हणतात-

"हलकी भारी जात विषारी
भेद अंतरी नसावा
ब्राह्मण आणि भंगी आता
एका ताटी बसावा"[३].

डॉ.बाबासाहेबांनी आयुष्यभर परिश्रम करून हजारो वर्ष अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेल्या व माणसासारखी माणसे असूनही पशुसारखे, गुलामासारखे जीवन जगणाऱ्या आणि रुढी, प्रथा, परंपरांच्या अनेक बंधनाच्या जंगलात जीवन जगणार्या आपल्या समाज बांधवांना त्यातून मुक्त केले व भारतीय संविधानाच्या माध्यमातून त्यांना मुल्यवान व माणुसकी जीवन बहाल केले. हे ऋण आठवताना वामन दादा लिहितात-

"त्याने रूढी बंधनातून काढले तुम्हा ओढून
आठवून तयाचे ऋण, व्हा मुक्त तुम्ही त्यातून
गाऊन तयाचे गुण, टाकावे गाव गर्जून
ही अशीच आरती गाजा".[४]

गावाच्या वेशीबाहेरील वस्तीला अस्पृश्यतेच्या आवरणात लपेटणारी येथील मनुवादी संस्कृती नैसर्गिक पाण्यासाठी हाडामांसाच्या माणसांना वंचित ठेवत होती, तर दुसरीकडे प्राण्यांसाठी खुली असणारी देवालये बहिष्कृतांना मात्र बंद होती अशा विषमतावादी संस्कृतीचे पितळ उघडे पाडताना वामनदादा म्हणतात-

"माणसास पाणी पाजा माणसास पाणी
निनादत होती सारी भिमाचीच वाणी
इतिहास होता चवदार तळ्याचा ताजा
उघडला नाही काळयारामाचा दरवाजा"[५]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेली सामाजिक क्रांती भारताचा इतिहास बदलणारी आहे ही सामाजिक क्रांती दुःखीतांना पोटाशी धरते. लोकशाहीची व्याख्या करताना "लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल रक्तविरहित मार्गाने घडवून आणणारी शासन पद्धती म्हणजे लोकशाही होय"६ असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. हे परिवर्तन घडवून आणण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वात पुढे होते हे वामनदादा आपल्या गीतातून सांगताना म्हणतात-



Scanned with CamScanner

"लोक लढा केला खडा भीमराज गर्जला
लेखणीचा तीर त्याने अरी वरी सोडला
रक्तविहीन क्रांतीचा धनी तोच एकला
शिंग फुंकले रुढीचा मोडण्यास माज
पुढे भीमराज असे पुढे भिमराज"[७]

**समारोप-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची स्वाभीमानाने ओळख करून देणाऱ्या वामनदादा कर्डक यांनी आपल्या भीम गीतांतून आयुष्यभर जनजागृतीचे व समाज जागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. ते स्वतःसाठी न जगता आयुष्यभर समाजासाठी जगले. आंबेडकरी समाजाने ही त्यांच्यावर भरभरून प्रेम केले वामनदादांची सामाजिक जाणीव तळागळातील माणसांबद्दल तळमळणारी होती. त्यांच्या लेखणी व वाणीला अन्यायाची प्रचंड चीड होती. समाजातील शोषक व विषमतावादी प्रवृत्तीवर ते लेखणीतून आग ओकत होते. त्यांची गीते दांभिकतेचे बुरखे फाडणारी आहेत. वामनदादांनी केवळ प्रस्थापितांवर टीका केली असे नाही तर स्वार्थी प्रवृत्तीच्या व समाजहितास बाधा ठरणाऱ्या स्वकीयांवरही टीका केली. त्यांच्या गीतांनी विषमतावादी समाजव्यस्थेविरुध्द पेटून उठण्याची व लढण्याची प्रेरणा दिली. माणसांकडून माणसांची होणारी विटंबना थांबली पाहिजे. भाकरीसाठी माणसाला लाचार व्हावे लागू नये. प्रत्येक माणसाच्या वाट्याला सन्मानाचे जीवन आले पाहिजे. वामनदादांची गीते मानवतावादी समाजरचना प्रस्थापित करणारी अशीच होती.

**संदर्भ-**


१. कांबळे उत्तम- वामनदादांच्या गीतांमधील भीमदर्शन्, सुगावा प्रकाशन, पुणे. प्र.आ.२००५, पृ. ७
२. डॉ.आंबेडकर बाबासाहेब- डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-२०, नरके हरी व इतर (संपा.), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई. प्रथमावृत्ती २००५. पृ. ११५ व ११६.
३. कर्डक वामनदादा- महाकवी वामनदादा कर्डक समग्र वाङमय खंड-२, गायकवाड माधवराव व जाधव सागर, (संपा.) आलोक-संबोधी प्रकाशन, यवतमाळ. प्रथमावृत्ती-२०१०, पृ.१३५.
४. तत्रैव- पृ. ९९.
५. कर्डक वामनदादा- महाकवी वामनदादा कर्डक समग्र वाङमय खंड-१, गायकवाड माधवराव व जाधव सागर (संपा.) आलोक-संबोधी प्रकाशन, यवतमाळ, प्रथमावृत्ती-२०१०. पृ. १११.
६. डॉ.आंबेडकर बाबासाहेब- डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-२०, नरके हरी व इतर (संपा.), उनि. पृ. ४४५.
७. कर्डक वामनदादा- महाकवी वामनदादा कर्डक समग्र वाङमय खंड-१, गायकवाड माधवराव व जाधव सागर (संपा.) उनि. पृ. १५२.


◆◆◆◆◆



Scanned with CamScanner